# राज्य निवडणूक आयोग

## महाराष्ट्र

१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.

(प्रसिद्धिपत्रक) दि. २४ मे २०१९

**नवी मुंबईसह ९ महानगरपालिकांतील**
**रिक्तपदांसाठी २३ जून रोजी मतदान**

मुंबई, दि. २४ (रानिआ): उल्हासनगर, नवी मुंबई, कल्याण- डोंबिवली, पुणे, कोल्हापूर, नाशिक, मालेगाव, परभणी व चंद्रपूर या नऊ महानगरपालिकांमधील १५ रिक्तपदांच्या पोटनिवडणुकीसाठी २३ जूनला मतदान; तर २४ जून २०१९ रोजी मतमोजणी होणार आहे, अशी माहिती राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांनी आज येथे दिली.

श्री. सहारिया यांनी सांगितले की, नामनिर्देशनपत्रे ३० मे २०१९ ते ६ जून २०१९ या कालावधीत दाखल करता येतील. २ व ५ जून २०१९ रोजी शासकीय सुट्टीमुळे नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्यात येणार नाहीत. ७ जून २०१९ रोजी नामनिर्देशनपत्रांची छाननी होईल. नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याची अंतिम मुदत १० जून २०१९ पर्यंत असेल. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना ११ जून २०१९ रोजी निवडणूक चिन्हे नेमून देण्यात येतील. २३ मे २०१९ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होईल. मतमोजणी २४ जून २०१९ रोजी सकाळी १० वाजता सुरू होईल.

**पोटनिवडणुका होणारे महानगरपालिकानिहाय प्रभाग: उल्हासनगर-** १ब आणि ५अ, **नवी मुंबई-** २९, **कल्याण-डोंबिवली-** २६, **पुणे-** ४२अ, ४२ब (हद्दवाढ क्षेत्रासाठी), आणि १अ, **कोल्हापूर-** २८ आणि ५५, **नाशिक-** १०ड, **मालेगाव-** ६क, **परभणी-** ११अ आणि ३ड व **चंद्रपूर-** ६ब आणि १३ब.

0-0-0

(Jagdish More, PRO, SEC)